।। सबका मालिक आत्मा ।।

सर्व देवांचा देव आत्मा ! आत्मा प्रत्येक हृदयात असतो.



आत्मा (SOUL)

।। हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ।।

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।। ॐ गुरुदेव ।।

आत्मा मालिक

मार्च - २०२५



।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व–रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २४ वे अंक ०३ रा मार्च २०२५ ● RNI-MAHMAR/2001/4853

संस्थापक संपादक

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

संपादक

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

संपादकीय सल्लागार

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

मार्गदर्शक

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

आत्मा मालिक ध्यानपीठ

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

धर्मशाळा (निवास व्यवस्था)

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

संपादकीय - खरा चमत्कार - संत परमानंद महाराज ४

देव एकच आहे! -डॉ. विजय बाणकर ६

ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण - भाग १ - नामदेव सदावर्ते १२

प्रसाद -बंडोपंत कुलकर्णी १७

ज्ञानेश्वरीतील 'आत्मा' दर्शक सौंदर्यस्थळे-भाग २ - डॉ. सुनील शिंदे १९

ईश्वराचे नामस्मरण -बी. के. गायकवाड २१

श्री महाशिवरात्री पर्वस्नान -बी. के. गायकवाड २४

कुंभ - नीता एवं नरेश यादव २६

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



खरा चमत्कार

संपादकीय

चमत्कार ही हातचलाखी आहे. त्यामुळे मला चमत्कार करता येत नाही म्हणजे मला सत्याचा बोध झाला नाही हा गैरसमज मनातून दूर करा. अनेक संतांनी कोणताही चमत्कार केला नाही. अस्तित्व हे रहस्य आहे, काव्य आहे. त्या रहस्यात मश्गुल होणे, त्या रहस्याप्रती कृतज्ञ होणे हा जगण्याचा सोपा मार्ग आहे. आकार आणि निराकार या एकसंधतेशी मुळात असलेली एकरुपता जाणण्याचा या रहस्यात जगणे हा पाया आहे. हे अस्तित्व स्वतःच एक चमत्कार आहे. निराकाराने कुठेही स्पर्श न करता आकार सांभाळला आहे. हाच खरा चमत्कार आहे.

-संत परमानंद महाराज

अस्तित्वातल्या कोणत्याही घटनेचा मागोवा घेवून तिचा कार्यकारणभाव बुद्धिने शोधला जाऊ शकतो. पण एका ठराविक मर्यादेनंतर बुद्धी उत्तर शोधू शकत नाही. तिथे रहस्य सुरू होते. सफरचंद खाली का पडते याचा उलगडा न्यूटनने गुरूत्वाकर्षणाचा शोध लावून केला. पण गुरूत्वाकर्षण म्हणजे काय हे त्याला सांगता आले नाही आणि ते कोणालाही सांगता येणार नाही. कारण ते रहस्य आहे.

या अस्तित्वाची निर्मिती कशी झाली याला एकमेव आणि अत्यंत अलौकिक उत्तर अष्टावक्रांनी आपल्या गीतेतच दिले आहे. तो म्हणतो, याची सुरुवात झालेली नाही. हे विश्व सुरूवातीपासून असेच आहे. निराकार आणि आकार हे अस्तित्वाचे स्वरुप कालात सुरू झालेले नाही. म्हणून त्याच्या मागे जाता येत नाही. ते एक रहस्य आहे. जगण्यासाठी आणि उपभोगण्यासाठी आता या क्षणी उपलब्ध असलेल्या रहस्याचा माणसाने चमत्काराचा ध्यास घेऊन आणि काल्पनिक कथा रचून पूर्णपणे बाजा मिरवला आहे.

सिद्धी आणि चमत्कार यांनी माणसाच्या मनाचा इतका आध्यात्मिक गोंधळ उडवून दिला आहे की बोलायची सोय नाही. त्यामुळे आपल्या निराकार आत्मस्वरुपाचा बोध होणे जवळ जवळ दुरापास्त झाले आहे. अमक्याने स्वतःचा देह सरळ आकाशात नेला, तमक्याला पाण्यावरुन चालत इकडून तिकडे जाता आले, कुणी इथे बसून पृथ्वीच्या त्या टोकाला काय चालले असेल ते सांगितले, एक ना अनेक पण या सगळ्या काल्पनिक कथा आहेत. समजा एकाला पाण्यावरुन सरळ चालत जाता आले तर त्या घटनेचा मागोवा घेऊन तीच घटना तशीच घडवता येईल. त्याचा कार्य कारणभाव शोधता येईल. पण चमत्कार आणि निराकाराचा बोध याचा काहीही संबंध नाही. आत्मरुपाच्या बोधाने तुमच्या जीवनात स्वास्थ्य येईल. तुम्हाला कोणताही चमत्कार करता येणार नाही.

चमत्कार ही हातचलाखी आहे. त्यामुळे मला चमत्कार करता येत नाही म्हणजे मला सत्याचा

बोध झाला नाही हा गैरसमज मनातून दूर करा. अनेक संतांनी कोणताही चमत्कार केला नाही. अस्तित्व हे रहस्य आहे, काव्य आहे. त्या रहस्यात मश्गुल होणे, त्या रहस्याप्रती कृतज्ञ होणे हा जगण्याचा सोपा मार्ग आहे. आकार आणि निराकार या एकसंधतेशी मुळात असलेली एकरुपता जाणण्याचा या रहस्यात जगणे हा पाया आहे. हे अस्तित्व स्वतःच एक चमत्कार आहे. निराकाराने कुठेही स्पर्श न करता आकार सांभाळला आहे. हाच खरा चमत्कार आहे.

ध्यानाचा साधा अर्थ लक्ष्य असा आहे. हिंदीत ज्या अर्थाने आपका ध्यान किधर है म्हणतात, तो ध्यानाचा खरा अर्थ आहे. लक्ष वेधल्यामुळे निराकार जाणीवेला दिशा निर्माण होते आणि लक्ष बहिर्गामी होते. निराकाराला स्वतःचा विसर पडतो. हेच ध्यान परत निराकाराकडून सद्गुरूंच्या रुपात आत्मस्वरुपाकडे वळविले की, आत्म्याचा बोध होतो. मन म्हणजे डोळ्यांसमोर आणि कानामध्ये चालू असलेला घटनांचा ऑडिओ व्हिज्युअल आहे. तुमचे लक्ष्य त्याच्यापासून निघाले की ते निराकारावर स्थिरावते. कोणत्याही प्रसंगी तुम्ही शांत राहू शकता.

कृष्णमूर्ती त्या घटनेला दॅट विच इज म्हणतात. ओशो नाऊ ॲण्ड हिअर म्हणतात. कृष्ण या स्थितीला सनातन वर्तमान म्हणतात. बुद्ध या घटनेला क्षणस्थ होणे म्हणतात. तुम्ही आत्म्याशी परत जोडले जाता. जो वियोग केवळ आपले ध्यान नसल्यामुळे झाला असे वाटत होते तो कधीही झाला नव्हता हे तुमच्या लक्षात येते.

झेन पंथात साधकाला वर्षानुवर्षे भिंतीकडे चेहरा करुन बसायला सांगितले जाते. एका क्षणी डोळ्यांसमोरुन चाललेला मनोचित्रपट त्याला दिसतो. मनाची लक्ष वेधून घेणारी बडबड थांबते आणि त्याला समोर कायम हजर असलेला निराकार दिसू लागतो. तुम्हाला भिंतीसमोर बसायची गरज नाही. फक्त आत्मरुपात सद्गुरूंना बघायची सवय करो.

एकदा तुम्हाला ही सोपी पद्धत जमू लागली की तुम्हाला सगळीकडे निराकार तत्व सद्गुरूंच्या रुपात दिसू लागतो. त्याची तुम्हाला प्रचीती येईल. तुमचे लक्ष्य चित्राकडून पडद्याकडे जाईल. जोपर्यंत पडदा दिसत नाही, तोपर्यंतच चित्रपट खरा वाटतो. ज्या क्षणी पडदा दिसतो त्या क्षणी चित्रपटाचा परिणाम शून्य असतो. ध्यान केल्यास तुम्हालाही शाश्वताची प्रचीती येईल. तुमच्या जीवनात शांतता येईल. आत्मविकास होईल.

||आत्मा मालिक||

-संत परमानंद महाराज,

संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



देव एकच आहे!

पशुपक्ष्यांप्रमाणे पृथ्वीवरील सर्व मानव एकाच जातीचे आहेत. शरीररचना, मूलभूत प्रेरणा किंवा जीवनाशय समान असलेल्या सर्व मानवांसाठीच्या 'देवदत्त' धर्माची पायाभूत तत्त्वेही समान वा तीच आहेत, असे इस्लाम व हिंदू धर्मग्रंथांचा तौलनिक व साक्षेपी अभ्यास करताना पदोपदी जाणवत राहते. हे दोन्ही धर्म ईश्वर-केंद्री (गॉड-सेंटर्ड) आहेत, अल्लाह व श्रीविष्णू हे एकरूपच असल्याने दोनही धर्म एकात्म आहेत, हे अंतिम सत्य साधार सूचित वा स्पष्ट करणे, हा या लेखाचा विषय आहे.

- डॉ. विजय बाणकर

''त्या अनंतालाच काही लोक गॉड म्हणतात, काही अल्ला म्हणतात,
काही जिहोवा म्हणतात, काही जोव्ह म्हणतात तर काही त्याला
आणखीणच निराळे नाव देतात. वेदान्ती त्याला ब्रह्म म्हणतात.''

(स्वामी विवेकानंद)

'हिंदू, ख्रिश्चन, इस्लाम, बौद्ध हे सारे गटव्यापी धर्म आहेत....आणि ....जीवरूपी 'स्व'ने देवरूपी 'स्व'ची सोऽहं-भावयुक्त ध्यानधारणा करणे हा स्वधर्मच खरा विश्वव्यापी मानवधर्म आहे', हा माझे गुरूदेव म्हणजे श्रीहंबीरबाबा यांचा उपदेश[१] आणि 'या उपाधिमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। ते तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।' ही संत श्रीज्ञानेश्वर यांची ओवी,[२] ही दोन संतवचने या लेखाची प्रेरणास्थाने आहेत.

जॉन कार्टेल्यू हे शिकागोच्या डी. पॉल विद्यापीठातील एक शास्त्रज्ञ होते. उभयचर म्हणजे जलचर व भूचर असलेल्या प्राण्यांच्या अंत:स्रावी ग्रंथींविषयी त्यांनी संशोधन केले. असा प्रसिद्ध माणूस आपल्या कॅथॉलिक पंथियांच्या संघटनेचा पदाधिकारी असावा, असे पंथाभिमानी मंडळींना वाटले. त्यांनी कार्टेल्यूंना तशी विनंती केली. प्रबोधनात्मक सविनय नकार देताना ते म्हणाले, 'संशोधन करताना, हे बेडूक कॅथॉलिक व हे बेडूक प्रॉटेस्टंट आहेत, असे मला कुठेही आढळून आले नाही.'[३]

बेडूक व इतर पशुपक्ष्यांप्रमाणे पृथ्वीवरील सर्व मानव एकाच जातीचे आहेत. शरीररचना, मूलभूत प्रेरणा किंवा जीवनाशय समान असलेल्या सर्व मानवांसाठीच्या 'देवदत्त' धर्माची पायाभूत तत्त्वेही समान वा तीच आहेत, असे इस्लाम व हिंदू धर्मग्रंथांचा तौलनिक व साक्षेपी अभ्यास करताना पदोपदी जाणवत राहते.[४] हे दोन्ही धर्म ईश्वर-केंद्री (गॉड-सेंटर्ड) आहेत, अल्लाह व श्रीविष्णू हे एकरूपच असल्याने दोनही धर्म एकात्म आहेत, हे अंतिम सत्य साधार सूचित वा स्पष्ट करणे, हा या लेखाचा विषय आहे.

या लेखाचे तीन भाग केले आहेत. पहिल्यात अल्लाह व विष्णू यांच्या सर्वव्यापकत्वाच्या अनुभूतीबाबतच्या उद्‌गारांच्या आधारे, तर दुसऱ्यात त्यांच्या नामांच्या आधारे त्यांचे अद्वैत अनुमानिले आहे. तिसऱ्या भागात हिंदूंच्या व मुसलमानांच्या वैयक्तिक धर्माचरणातील आशय समान असल्याचे दाखवून हे दोन्ही धर्म एकात्म आहेत, असे सूचित केले आहे.

भाग १

अल्लाह व श्रीविष्णू सर्वव्यापक म्हणून एकच होत.

परमेश्वराची तीन प्रमुख लक्षणे (ॲट्रिब्यूट्स) सांगितली जातात. सर्वज्ञता, सर्वशक्तिमत्व आणि सर्वव्यापकत्व. यांपैकी सर्वज्ञता व सर्वशक्तिमत्व ही पहिली दोन लक्षणे लोक मान्य करतात. परंतु

परमेश्वराचे सर्वव्यापकत्व सर्वांनाच अनाकलनीय वाटते. अल्लाह व श्रीविष्णू सर्व वस्तूत आहे (अंतर्यामी), सर्वांना व्यापून (सर्वव्यापी) उरलेला (सर्वातीत) आहे, हे मान्य केले की इस्लाम व हिंदू हे दोन्ही धर्म आपापले वेगळेपण राखून ठेवण्याचा आग्रह धरूच शकत नाहीत; ते अपरिहार्यपणे एकात्म (वन) होतात.

परिणामी, हिंदू, मुसलमान यांसारख्या समूहवाचक धर्मनामांना व्यावहारिक सोयीपलीकडे काही अर्थ व महत्त्व उरत नाही आणि शेकडो वर्षे वा आजपर्यंत जपलेले 'स्व-त्व' मुळातच निराधार आहे, अशी जाणीव स्पष्ट होत जाते व आपल्या धर्मश्रद्धांना धक्का बसतो की काय, अशी भीती वाटू लागते. त्यामुळे आपल्या जन्मापासून आपल्यावर संस्कारित केले गेलेले 'मी हिंदू', 'मी मुसलमान' यासारखे समज विचारातही तपासण्याची तयारी होत नाही. ही तयारी व्हावी आणि आपण सारे त्या एकाच देवाची भक्ती करीत असतो, अशी स्वामी विवेकानंदांप्रमाणे आपलीही मनोमन खात्री व्हावी[५] म्हणून अल्लाहच्या व श्रीविष्णूच्या सर्वव्यापकत्वाच्या अनुभूतीबाबतचे म्हणजे साक्षात्कारी असे एकमेकांशी तंतोतंत जुळणारे उद्‌गार उद्धृत करतो :-

१. 'गॉड हॅज् सव्हेंट्स, व्हू इट थ्रू हिम, अँड ड्रिंक थ्रू हिम, अँड सिट थ्रू हिम, अँड लिव्ह थ्रू हिम, अँड अबाईड इन कॉंटेम्प्लेशन ऑफ हिम,' असे एका इस्लामी-सुफीने म्हटले आहे[६] आणि 'देव खाते देव पिते। देवावरी मी निजते।।१।। देव देते देव घेते। देवासवें व्यवहारिते।।२।। देव येथे देव तेथे। देवाविण नाही रिते।।३।। जनी म्हणे विठाबाई। भरूनि उरले अंतरबाही।।४।।', असे हिंदूधर्मीय संत श्रीजनाबाईंनी देखील म्हटले आहे.

२. मुसलमानांना प्रमाणभूत असलेल्या पवित्र कुराणात प्रेषित मुहम्मद हे अल्लाह सर्वत्र असल्याचे म्हणतात, 'अन्टू अल्लाह बिलाँग दि ईस्ट अँड वेस्ट, अँड विदरसोएव्हर यी टर्न देअर इज् अल्लाहज् काऊंटेनन्स. लो! अल्लाह इज् ऑल-एम्ब्रेसिंग, ऑल नोईंग.'[७] तर, हिंदूंना शिरोधार्य असलेल्या श्रीमद्भगवद्‌गीतेतही भक्तराज अर्जुन श्रीविष्णूचा अवतार असलेल्या भगवान श्रीकृष्णाच्या स्वरूपाबाबत त्यालाच संबोधित असेच म्हणतो, 'हे महात्मन्, हे स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधले आकाश तसेच सर्व दिशा एकट्या आपल्यानेच भरून राहिल्या आहेत.'[८] 'अल्लाहच्या प्रकाशाने पृथ्वी आणि आकाश यांमधील सर्वकाही व्यापलेले आहे', अशीही एक हदीथ आहे.[९]

३. इस्लामधर्मीय सुफी शेख मौलाना अब्दुल रहीम रायपुरी यांच्या एका शिष्याला अल्लाहचा प्रकाश चोहीकडे भरून राहिला असल्याचा सदोदित अनुभव येऊ लागल्यामुळे कुठेही लघवीला जाणे प्रशस्त वाटेनासे झाले होते. ईश्वराप्रमाणेच गुप्त असलेल्या अनेक गोष्टींचे साक्षात्कारी ज्ञान देणारे शेकडो-हजारो प्रसंग दिव्यदृष्टी लाभलेल्या भक्तांबाबत घडलेले आहेत, असे 'दि टीचिंग्ज ऑफ इस्लाम' या पुस्तकातील 'दि व्हर्च्युज् ऑफ जिक्र' या उपपुस्तकात म्हटले आहे.[१०] हिंदूधर्मीय संत श्रीएकनाथ यांनाही अनंत प्रकाशरूप परमात्मा सर्वत्र असल्याचा प्रत्यय आला तेव्हा त्यांनीही 'चिन्मात्र पूर्ण कोंदले' असे म्हटले आहे.[११] विश्वरूपदर्शनाने अर्जुनाची स्थितीही उपरोक्त सुफी-शिष्याप्रमाणे झाली होती, असे म्हणता येते.[१२]

४. श्रीकृष्ण-परमात्म्याच्या विश्वरूपाचे दर्शन झाले तेव्हा 'चराचराचे जन्मस्थान'[१३] असलेल्या देवाधिदेवास सर्व देव-देवता, मनुष्य, सिद्ध, किन्नर किंबहुना हे स्थावरजंगमात्मक विश्व हर्षयुक्त होऊन नमस्कार करीत आहे, असे अर्जुनाला स्पष्ट झाले.[१४] तर 'अव्यक्त निराकार नाही ज्यां आकार। जेथोनी चराचर हरिसी भजे।।' असा स्वानुभवसिद्ध अभंगही श्रीज्ञानेश्वरांनी लिहिला आहे.[१५] प्रेषित मुहम्मद यांनीही अगदी असेच वर्णन अनेकदा केले आहे. उदा. 'सृष्टीत असे कुणीही वा काहीही नाही की जे अल्लाहचे गुणगान करीत नाहीत; पण तुम्हाला त्यांची भाषा समजत नाही,' असे त्यांनी म्हटले आहे.[१६] यांसारखी शेकडो समानार्थी वचने दोन्ही धर्मांच्या ग्रंथांमध्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे, त्यांतून एकच तत्त्व

निश्चित होते : सुफींचा अल्लाह व संतांचा श्रीविष्णू हे स्वरूपतः दोन नाहीत. सर्वव्यापक असलेल्या दोन गोष्टी मूलतः दोन म्हणजे विभिन्न असूच शकत नाहीत. अर्थात, जो अल्लाह तोच श्रीविष्णू होय, असे निश्चित होते.

भाग २

गुणनामांचा परम अर्थ एकच म्हणून अल्लाह व श्रीविष्णु एकरूप होत. परमेश्वर मनुष्यादि प्राण्यांसारखा सगुण, साकार वगैरे आहे, असे समजणे हे जसे इस्लामला अमान्य आहे[१७] तसेच परमात्म्याला मानवसदृश मानणे हे अज्ञानापोटी घडते, असे सुस्पष्ट विधान हिंदू धर्माला आधारभूत असलेल्या गीता-ज्ञानेश्वरीतही केले आहे.[१८] तथापि भक्तांनी शुद्ध अंतःकरणाने परमेश्वराच्या ज्या गुणांची, शक्तीची उपासना करावी अशी स्वतः परमेश्वराची तसेच त्याच्या प्रेषितांची, विभूतिंची आणि भक्तांची इच्छा असते, त्या गुणांची पूर्णावस्था (परफेक्शन) फक्त परमेश्वरच होय. म्हणून त्याच्या नामांचा जप दोन्ही धर्मांतील श्रद्धावान करीत असतात. पवित्र कुराणात व 'हदीथ'मध्ये अल्लाहची शेकडो, हजारो नावे असली तरी त्यातील नव्याण्णव नावे प्रमुख मानली जातात. 'जो ही सुंदर नामे पाठ करील आणि स्मृतीत ठेवील त्यास स्वर्ग लाभेल' तसेच 'अल्लाहचे गुणवर्णन केले तर त्याची समीपता प्राप्त होते, त्याचा साक्षात्कार होतो', असेही प्रेषित मुहम्मद यांनी म्हटले आहे;[१९] तर 'श्रीविष्णुनामांचा भक्तिभावपूर्वक जप केल्याने व्यक्ती सर्वदुःखातीत होते', असे महाभारतकारांनी सांगितले आहे.[२०]

अल्लाहची बहुतेक नामे श्रीविष्णूच्या नामांशी तंतोतंत जुळतात. उर्वरित नामेदेखील परम अर्थदृष्ट्या समान आहेत. नमुन्यादाखल काही ठळक नामे इथे पाच गटात वर्गीकृत केली आहेत.[२१] प्रथम अल्लाहचे नाम, नंतर श्रीविष्णूचे नाम आणि नंतर या दोन्ही नामांचा समान अर्थ इंग्रजीत दिला आहे :-

१. विश्वशास्त्रीय गुणनामे :

(१) अल्लाह-सर्वेश्वर-गॉड, (२) हक्क-सत्-ट्रूथ, (३) मालिक-सुराध्यक्ष-मास्टर, (४) मुसव्विर-विधाता-फॅशनर, (५) कबीर-बृहत्-ग्रेट, (६) मुबदि-सर्वादि-बिगिनर, (७) समद-सनातन-एटर्नल, (८) अव्वल-आदिदेव-फर्स्ट, (९) आखिर-परायणम्-लास्ट.

२. सत्ताशास्त्रीय गुणनामे :

(१) बसीर-सर्वदर्शी-ऑलसीईंग, (२)अलीम-सर्वज्ञ-ऑलनोईंग, (३) मतीन-स्थिर-फर्म, (४) कादिर-महाशक्ती-ऑलमायटी, (५) शहीद-साक्षी-विटनेस, (६) रकीब-प्रजागर-वॉचफूल, (७) जामी-संग्रह-गॅदरर.

३. नैतिक गुणनामे :

(१) बर्र-शिव-गुड, (२) सलाम-शांती-पीस, (३) हमीद-स्तव्य-प्रेजवर्दी, (४) वलीय-लोकबंधू-फ्रेंड, (५) वहाब-वरद-बिस्टोवर, (६) वदूद-मधुः-लव्हिंग, (७) मुकसीत-समात्मा-इक्विटेबल.

४. समाजशास्त्रीय गुणनामे :

(१) कहार-प्रभू- ऑलकम्पेलिंग, (२) हादि-मार्ग-गाईड, (३) रहमान-हरि-मर्सिफूल, (४) रहीम-सुंद-कंपॅशनेट, (५) हाकम-उर्जितशासन-जज्ज, (६) तव्वाब-अक्रूर-रिलेंटिंग, (७) गफूर-सदामर्षी-फरगिव्हर, (८) मुहैमिन-रक्षणः-हेल्प इन पेरिल.

५. साक्षात्कारशास्त्रीय गुणनामे :

(१) नूर-प्रकाशात्मा/देव-लाईट, (२) बातिन-गुप्त-हिडन, (३) जाहीर-परमस्पष्ट-मॅनिफेस्ट, (४) मजीद-श्रीमान-ग्लोरिअस, (५) कय्यूम-स्वयंभू-सेल्फसबसिस्टिंग, (६) रफी-राम-एक्झाल्टर, (७) लतीफ-महामन-ग्रेसियस, (८) वाहिद-एकः-वन.

ऋषिमुनींनी चराचराचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ताही असलेल्या व त्या चराचरास आपल्यात

स्थित ठेवणाऱ्या आत्मरूप (= ब्रह्मस्वरूप) श्रीमहागणपतीस 'त्वं ब्रह्मा। त्वं विष्णुः। त्वं रुद्रः। त्वं अग्निः....', असे स्वानुभूतिपूर्वक संबोधिले आहे. त्यांचे अनुकरण करीत म्हणजे ईशनामांचा परमार्थ लक्षात घेऊन देवाबद्दल आपणही 'त्वं अल्लाह। त्वं विष्णुः।' असे ज्ञानभक्तिभावयुक्त म्हणत आचरण केले तरच धार्मिक एकात्मता साधली जाईल.

भाग ३

वैयक्तिक धर्माचरणाचा आशय एकच म्हणून दोन्ही धर्म एकात्म होत.

'विल्यम जेम्स यांनी संस्थारूप धर्म व वैयक्तिक धर्म असे दोन प्रकार पाडले आहेत. यज्ञ वा पूजा म्हणजे कर्मकांड, सण, उत्सव, पुरोहित संघटना इत्यादि गोष्टी मुख्यतः संस्थारूप धर्मात अंतर्भूत होतात. वैयक्तिक धर्म हा व्यक्तीच्या हृदयाचा धर्म असतो.... वस्तुतः हा वैयक्तिक धर्मच सर्व धर्मांचा मूलभूत भाग आहे, ऋषि, सिद्ध, बुद्ध, मोझेस, ख्रिस्त, लाओत्से, मुहम्मद किंवा पंथप्रवर्तक साधुसंत यांचा हा वैयक्तिक धर्म होय.'[२२]

आत्मज्ञानपूर्वक ईश्वरानुभूती हे धर्माचरणाचे साध्य आहे. वैयक्तिक धर्म हे त्याचे साधन आहे. हिंदू व इस्लाम या दोन्ही धर्मांच्या साहित्यात आढळणाऱ्या वैयक्तिक धर्मविषयक वर्णनांचा आशय एकच आहे. किंबहुना दोन्ही धर्मात सांगितलेला सर्वोच्च भक्तिप्रकार ('थोर भक्ती') एकच आहे, हे सूचित करण्यासाठी प्रार्थना, जिहाद, उपवास आणि तीर्थयात्रा या चार बाबींतील एकता क्रमशः स्पष्ट करतो :-

१. प्रार्थना : बाह्य विश्वात देव आहे असे नुसते मानण्याने किंवा फक्त म्हणण्याने नव्हे; तर, देव आपल्यातही आहे असा अनुभव आला तरच 'देव आहे' अशी पक्की खात्री पटते. 'एकान्तात अल्लाशी एकरूप होणे म्हणजे प्रार्थना', असे प्रेषित महंमद पैगंबर यांनी अनेकदा म्हटले आहे.[२३] आणि 'ठायींच बैसोनि करा एकचित्त। आवडीं अनंत आळवावा।।' असे संत श्रीतुकाराम यांनी एका अभंगात म्हटले आहे.[२४] शुद्ध अंतःकरण हा प्रार्थनेचा आत्मा आहे, त्यावाचून प्रार्थना म्हणजे केवळ शारीरिक हालचाली किंवा ढोंग मानले गेले आहे.

२. जिहाद : जिहाद हा शब्द इस्लाम-धर्माशी निगडित आहे. परंतु खरे धर्माचरण म्हणजे जिहादच असते. 'स्वतःच्या कामक्रोधादि विकारांवर संयम करून परमेश्वराशी समीपता साधण्यासाठीची अविरत धडपड म्हणजे जिहाद होय'.[२५] संत होणे हे जसे इस्लाम धर्मीयांचे परमोच्च ध्येय आहे तसेच ते हिंदुंचेही आहे. हे ध्येय गाठले जावे म्हणूनच उदाहरणार्थ, संत श्रीतुकाराम यांनी अखंड जिहाद पुकारला होता. ते म्हणतात, 'रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।।१।।'

३. उपवास : देवाच्या जवळ (उप) राहणे (वास) म्हणजे खरा उपवास होय. 'सदा सर्वदा देव सन्निध आहे'[२६] ही अखंड श्रद्धा बाळगून कायावाचामनसा ईश्वरनिष्ठ वा आत्मनिष्ठ राहणे म्हणजे उपवास होय. काही वेळ स्वतःला अन्नपाण्यापासून दूर ठेवणे हा उपवासाचा अगदी संकुचित वा प्राथमिक अर्थ आहे. महंमद पैगंबर यांनी उपवासाचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे : 'उपवास ही केवळ एक शारीरिक अनुभूती होऊ नये. उपवास करताना संतोषपूर्वक देवाचे अखंड स्मरण केले पाहिजे. दैवी आनंदप्राप्ती हे उपवासाचे खरे उद्दिष्ट आहे.'[२७] हाच विचार पुढील समर्थोक्तीत आहे -

'देवाच्या सख्यत्वाकारणे। आपले सौख्य सोडून देणे।
अनन्यभावें जीवेंप्राणें। शरीर तेहि वेचावे।।'[२८]

४. तीर्थयात्रा : मुसलमान मक्केची यात्रा इच्छितात, हिंदू लोक तीर्थांना भेटी देतात. आत्मदेवदर्शनविरहित किंवा ईश्वरानुभूतिशिवाय तीर्थयात्रा सफल होत नाही, असे दोन्ही धर्मसाहित्यात स्पष्ट केले गेले आहे. उदाहरणार्थ, 'ज्याला मक्केमध्ये देवाचे दर्शन घडत नाही त्याची अवस्था घरी देवाचे दर्शन घडत नसताना

जशी होती अगदी तशीच असते; आणि ज्याला स्वत:च्या घरी देवाचे दर्शन होत असते त्याची अवस्था मक्केमध्ये देवाचे दर्शन घडत असताना जशी होते अगदी तशीच असते. .... यात्रेचा खरा हेतू काबाला भेट देणे हा नसून देवाचे अखंड ध्यान लागून राहण्याची मन:स्थिती प्राप्त करून घेणे हा आहे', असे एका सुफीने मक्का-यात्रेचे मूल्यमापन केले आहे.[२९] महाराष्ट्रीय संतांनी आत्मदेवदर्शनविरहित तीर्थयात्रेतील व्यर्थता सांगितली आहे. उदाहरणार्थ, संत श्रीतुकाराम म्हणतात,

'देहीं असुनिया देव। व्यर्थ हिंडतोस निदैव।।१।।
देव आहे अंतर्यामीं। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं।।२।।
तुका सांगे मूढ जनां। देहीं देव का पहाना।।३।।'

संत श्रीज्ञानदेवांनी तर आत्मदेवदर्शनविरहित तीर्थयात्रेला 'परधर्म' असे संबोधिले आहे -

'जवळी देवो आणि दाही दिशा हिंडती।
स्वधर्म सांडुनी परधर्मीं रती।।'[३०]

श्रीज्ञानेश्वर व श्रीतुकाराम या संतांनी मांडलेला विचार समर्थ श्रीरामदासस्वामी यांनी देखील प्रतिपादित करून देवशोधनाची दिशा स्पष्ट केली आहे. ते म्हणतात,

'आत्मा वर्तवितो शरीर। तोचि देव उत्तरोत्तर।
जाणीवरूपें कलेवर। विवेकें वर्तवी।।
तो अंतर्देव चुकती। धांवा घेऊन तीर्थां जाती।
प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणता।।'[३१]

थोडक्यात, देवदर्शनविरहित किंवा शुद्धभावविरहित तसेच केवळ इच्छापूर्तीसाठीचे धर्माचरण म्हणजे धर्म नव्हे. आत्मदेवदर्शनपूर्वक धर्माचरण करणारे हिंदू आणि मुसलमान एकाच देवाची भक्ती करीत असतात. हे सत्य निरपेक्षपणे समजून घेतले की धर्मनिरपेक्षता व्यवहारातही उतरते आणि दोन्ही धर्मांच्या एकात्मतेचा संस्कार दृढ होतो.

* * * * *

संदर्भसूची व टिपा :

०१. जीवनकलेची साधना, १०वी आवृत्ती, पृष्ठ क्र. ५९-६०;
०२. ज्ञानेश्वरी, २.१२६;
०३. पृष्ठ क्र. १५, साप्ताहिक सकाळ, पुणे. (२७ मे १९८९);
०४. हिंदुंचे ध्येय जसे 'अहं ब्रह्मास्मि' या तत्त्वाचा अखंडानुभव घेणे हे आहे.
तसेच मुसलमानांचेदेखील 'अनल हक्क' (= मैं खूदा हूँ - आय ॲम दि ट्रूथ) असा सदोदित साक्षात अनुभव प्राप्त करून घेणे, हे ध्येय निर्धारित केल्याचे आढळते. उदा. अल् गझाली यांनी असे विवरण केले आहे. पाहा, मिश्कत अल् अन्वर, अनु. दि नेचे फॉर लाईट्स; पृष्ठ क्र. ६०;
०५. पाहा लेखारंभीचे विधान, ज्ञानयोग; पृष्ठ क्र. १२१;
०६. दि कश्फ अल् महजूब - अन्व्हेलिंग ऑफ दि व्हेल्ड; पृष्ठ क्र. १९१;
०७. दि मीनिंग ऑफ होली कुराण, इंग्रजी अनुवाद, मोहम्मद एम् पिक्थॉल - २.११५;
०८. 'द्यावापृथिव्योरिदमन्तरम् हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वा:।' - गीता, ११.२०;
०९. 'हिज् नूर (लाईट) कव्हर्स एव्हरीथिंग बिट्विन दि अर्थ अँड दि स्काय.' -
दि व्हर्च्युज् ऑफ जिक्र; पृष्ठ क्र. २००;
१०. कित्ता; पृष्ठ क्र. २२६,
११. ध्याता-ध्येय-ध्यान या त्रिपुटीचा लय झाल्यानंतरच्या स्वानुभवाविषयी संत एकनाथ म्हणतात, 'तेथ

निमाले जीवाचे जीवपण। ज्ञातृत्वेंसी निमाले ज्ञान। निमाले प्रपंचाचे भान। चिन्मात्रपूर्ण कोंदले।।'
- श्रीएकनाथी भागवत, ९.१४६;

१२. सर्वत्र देव असल्याने आपले जीवित्व धोक्यात आले की काय अशी भीती अर्जुनाच्या देहात्मभावास स्पर्शून गेली (होती).- ज्ञानेश्वरी, ११.३७३-७४;

१३. तत्रैव, ११.५६१;

१४. तत्रैव, ११.५०६;

१५. हरिपाठ, अभंग क्र. ३;

१६. 'देअर इज् नन अमंग दि क्रिएशन दॅट डज् नॉट हिम्न ग्लोरिफिकेशन ऑफ अल्लाह, बट यू डू नॉट अंडरस्टँड देअर स्पीच.' - दि व्हर्च्युज् ऑफ जिक्र, पृष्ठ क्र. २२३;

१७. 'दि रिलीजन ऑफ इस्लाम'च्या पृष्ठ क्र. १५४वर लेखक मौलाना मोहम्मद अली म्हणतात, 'गॉड इज् स्पोकन ऑफ इन दि होली कुराण ॲज् सीईंग हिअरिंग, स्पीकिंग....बट, दि यूज ऑफ दीज् वर्ड्स मस्ट नॉट बि टेकन इन एनी सेन्स ॲज् इंडिकेटिंग ॲन् ॲन्थ्रॉपॉमॉर्फिक कन्सेप्शन ऑफ दि डिव्हाईन बीईंग.'

१८. गीतेत श्रीकृष्ण म्हणतात, 'अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् । परंभावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।' (९.११) या श्लोकाचा श्रीज्ञानेश्वरांनी केलेला भावार्थ मुळातून वाचणे अधिक उद्बोधक ठरेल. त्यासाठी उदा. पहा ओव्या क्र.९.१५६, १६९-१७१.

१९. अ) अस्मा उल् हसना (ईशनामस्मरण); ब) पृष्ठ क्र. ७९, दि व्हर्च्युज् ऑफ जिक्र, पृष्ठ क्र. ७९;

२०. श्रीविष्णुसहस्रनाम, पृष्ठ क्र. १०;

२१. 'धर्माचे तत्त्वज्ञान' या पुस्तकात लेखक डॉ. ज. वा. जोशी यांनी ही वर्गनामे व त्यापुढे ईश्वराचे काही गुण उल्लेखिले आहेत.

२२. सर्वधर्मसमीक्षा; पृष्ठ क्र. १३;

२३. पूर्वोक्त दि रिलीजन ऑफ इस्लाम, पृष्ठ क्र. ३५९ व ५४९;

२४. श्रीतुकाराम अभंग : नामसंकीर्तन साधन पैं सोपे;

२५. दि कश्फ अल् महजूब - अन्व्हेलिंग ऑफ दि व्हेल्ड, पृष्ठ क्र. ३२९;

२६. समर्थ श्रीरामदासकृत 'मनाचे श्लोक, श्लोक क्र. ३६;

२७. दि रिलीजन ऑफ इस्लाम, पृष्ठ क्र. ४८१;

२८. दासबोध, ४.८.६;

२९. दि कश्फ अल् महजूब - अन्व्हेलिंग ऑफ दि व्हेल्ड, पृष्ठ क्र. ३२९;

३०. श्रीज्ञानदेव अभंग : संसारयात्रा भरली थोर .....;

३१. दासबोध, १८.८.१० व ११;

* याशिवाय पुढील तीन पुस्तके संदर्भ म्हणून वापरली आहेत - अ) दि मोस्ट ब्युटिफूल नेम्स, ब) इस्लाम्स रोझरी, क) श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्रम्, इंग्रजी अनुवाद.

- डॉ. विजय बाणकर,
बी - ११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,
मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर.एस.),
सिंहगड रोड, पुणे - ४११०२४
(९३२५५८८०९५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण - भाग १

आपले शरीर अन्नमय आहे. जीवंत राहण्यासाठी अन्न खावेच लागते. अन्न हे ब्रह्मरुप आहे. अन्नरसांच्या सेवनाशिवाय शरीर जीवंत राहणे अशक्य आहे. आपण जे अन्न खातो, ते शरीराला हितकारी असावे. आपण जे अन्न खातो ते सात्विक, पवित्र, सुपक्व, पौष्टिक असावे. सात्विक आहार सेवनाने शरीर प्रकृती उत्तम राहते व राजस, तामस, अपथ्यकारी अन्नसेवनाने शरीर रोगाचे कोठार बनते. अस्वास्थ्यामुळे शरीर, मन बेचैन होते. दुःख, शोक, रोग निर्माण करणारा आहार कसा असतो, हे ज्ञानराजांनी सविस्तरपणे सांगितले आहे.

-नामदेव सदावर्ते

एका लग्नसमारंभाठी गेलो असता तेथील मान्यवरांना फेटे बांधून, शाल श्रीफळ देऊन सन्मानीत करण्यात येत होते. मानाच्या स्त्रियांनाही साड्या देऊन, खणानारळांनी ओटी भरण्यात येत होती. लग्नात खरा मान असतो वधूवरांना. पण त्यांच्याबरोबरच वऱ्हाडी मंडळीसुद्धा मान-पान दिला जातो. ज्ञानराज म्हणतात-

अहो वधुवरांचिये मिळणी। जैसी वऱ्हाडीयांही लुगडी लेणी।
तैसी देशियेच्या सुखासनी। मिरविले रस।।

लग्न म्हणजे केवळ वधू-वरच एकत्र येत नाहीत, तर ती दोन कुटुंबे स्नेहबंधनात बांधली जातात. अनेक मैलांच्या अंतरावर राहणारी दोन कुटुंबे सोयरीक जुळवतात. त्यासाठी दोन्ही कुटुंबांत स्नेह निर्माण व्हावा लागतो. दोन्ही कुटुंबात जर समजूतदारपणा, दिलदार वृत्ती असेल तरच लग्न जुळते. ज्ञानराज म्हणतात-

रावो तेथे कटक। सौजन्य तेथे सोईरिक।
वन्ही तेथे दाहक। सामर्थ्य की।।

हिंदू लग्न पद्धतीत वधूस वराच्या घरी नांदावयास जावे लागते. आईवडीलांचे घर सोडून, माहेर सोडून नवरी आपल्या पतीच्या घरी जाते. ज्ञानराज सांगतात-

सांडूनिया कुळे दोन्ही । प्रियासी अनुसरे कामिनी ।
तैसी द्वंद्व त्यागे स्वचिंतनी । पडली असे ।।

दोन्ही कुळे शोधून आपल्या मुला-मुलींचे विवाह लावतात. ते केवळ वंशविस्ताराच्या हेतूने. मनुष्य जातीतच विवाह केले जातात. पशूपक्षांचाही वंशविस्तार होतो, पण विवाहसंस्कार केवळ मानवातच होतात. ज्ञानराज म्हणतात-

आणि कुळे शोधूनि दोन्ही। कुमारेंचि शुभलग्नी।
मेळविजती प्रजासानी। हेतु जरी।।
तरी पशुपक्षादि जाती। जया मिती नाही संतती।
तया कोणे प्रतिपत्ती। विवाह केले।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

आणि पशू-पक्षांच्या विवाहप्रसंगी ब्राह्मण नसतो. ज्ञानराज सांगतात-

आणि पशूपक्षी विवाही। जोशी कामापरौता नाही।
तैसा तामसा यज्ञा पाही। आग्रहाचि मूळ।।

लग्न समारंभ झाला, जेवणावळी सुरू झाल्या. जेवण वरील मजल्यावर आहे असे समजले व तसेच तळमजल्यावरही बफे आहे, हे समजल्यावर माझा मित्र म्हणाला, आता तळमजल्यावर जेवावे की वरच्या मजल्यावर जेवण्यास जावे? मी त्यास म्हटले, कुठेही जेवण करा. अन्नपदार्थ एकच असतील. ज्ञानेश्वरीत ओवी आहे-

समर्थाचिया पंक्तिभोजने। तळिल्या वरिल्या एकचि पक्वान्ने।

एवढे थाटामाटात लग्न लावले. नंतर काही दिवसांनी मला समजले, या लग्नखर्चासाठी वधूपित्याने कर्ज काढले होते. कुणी मोठा अधिकारी, सत्ताधारी, राजकारणी आपल्या गावात येणार असल्यावर जसे सारे गरीब-श्रीमंत एकत्र येऊन रस्त्यावर सडारांगोळ्या घालून सजावट करतात. श्रीमंताकडून कपडे, दागिने आणून स्वतःच्या अंगावर घालून उसणे अवसान आणून स्वागत करतात. तो केवळ देखावा असतो. तसे कर्ज काढून केवळ मोठेपणा दाखविण्यासाठी अनेक लोक विवाहप्रसंग थाटात करतात. केवळ लोकांना दाखविण्यासाठी असे करणे योग्य नाही. ज्ञानराज सांगतात -

अधिकारिया रिगता गावो। होय जैसा उत्साहो।
कां रिणावरी विवाहो। विस्तारिला।।

आपण नातेवाईकांना, सोयऱ्यांना आमंत्रण दिले तर ते आहेर घेऊन येतील या अपेक्षेने वास्तुशांती किंवा सत्यनारायणासारखे विधी आयोजित करतात. अशा प्रसंगी ज्ञानेश्वरीची ओवी आठवते-

नाना दिठी घालूनि आहेरा। आवंतु जाईजे सोयरा।

पूर्वी लग्नाच्या गावी जाण्यासाठी वऱ्हाडी मंडळी घेऊन बैलगाड्यांनी जात असत. त्या बैलांसाठी चारा, कडबासुद्धा बरोबर नेत असत. कितीही श्रीमंताघरचे लग्न असले तरी बैलांना फक्त चाराच खायला देतील. वऱ्हाडी लोकांना जसे जिलबी, लाडू, गुलाबजाम देतात, ते बैलांना देतील काय? ज्ञानराज म्हणतात-

बैल तेथ करबाडे। हे न चुकेचि फुडे।
नेवो देत की वऱ्हाडे। समर्थाचिया।।

लग्न लावले. वऱ्हाड जेवले. सगळे घरी गेले. पहिल्या मुलासाठी मुलगी माहेरी गेली. नंतर तिला घेऊन जाण्यासाठी नवरदेव आपल्या काही मित्रांसह सासरवाडीला आला. लग्नास हजर नसलेल्या एका मैत्रिणीने नवरीस प्रश्न केला. या तरुणांमध्ये तुझा पती कोणता? तो टोपीवाला तुझा पती आहे का? त्यावर नवरी नाही असे म्हणते. दुसरा तो दाढीवाला तुझा पती आहे का? असे विचारल्यावर नवरी पुन्हा नाही असे म्हणते. नंतर मैत्रिण विचारते, तो उंचा-पुरा, धष्टपुष्ट पुरुष तुझा पती आहे का? हे ऐकताच ती काहीही न बोलता लाजते व मान खाली घालून उभी राहते. या प्रसंगाचे वर्णन ज्ञानराज करतात-

जैसे न सांगणेवरी। बाळा पतीसी रुप करी।
बोलु निमालेपणे विवरी। अचर्चाते।।

लग्नप्रसंगाच्या मंडपात जसे ज्ञानेश्वरीच्या काही ओव्यांचे सहज स्मरण झाले, तसेच एके दिवशी अचानक तब्येत बिघडल्यावर छातीत वेदना झाल्यामुळे मी तर घाबरलोच. पण ज्यांची तब्येत चांगली आहे असे घरातील सर्वजण घाबरले. एकाने डॉक्टरला फोन केला. एकाने नातेवाईकांना फोन लावले. एकाने

ॲम्ब्युलन्स बोलावली. अशी ती धावपळ सुरू झालेली पाहून ज्ञानेश्वरीतील ओवी सहज आठवली-

एऱ्हवी आयुष्याचे सूत्र बिघडता। भूताची उमटे खडाडतां।
तै न मरतयाही चित्ता। युगान्तु नोहे।।

आपले आयुष्याचे सूत्र बिघडल्यावर मरणाची भीती मनात निर्माण होते. त्या भितीमुळे आपण घाबरल्यामुळे ज्ञानेश्वरीच्या ओव्या आठवणारच नाहीत. पण मरणाविषयी ज्ञानराज म्हणतात-

धातयाही गेलिया शरण। त्रिदोषी चुके मरण।

शरीरात कफ, वात व पित्त असते. त्यात असंतुलन निर्माण झाल्यावर शरीरात दोष निर्माण होऊन आपण आजारी पडतो. शरीरास अपायकारक खाणे झाल्यावर पथ्य बिघडते. जर पथ्य पाळले तर शरीरात रोग होणारच नाही. ज्ञानराज सांगतात-

तरी न घालुनि महापुरी। न घेपे बुडण्याची शियारी।
कां रोगु न गणिजे घरी। पथ्याचिया।।

महापुरात उडीच घेतली नाही तर बुडण्याची भीती वाटणारच नाही. तसेच जर शरीराच्या आरोग्यासाठी आहार-विहाराचे पथ्य पाळले तर रोग होण्याची भीती राहत नाही. पथ्य पाळले नाही तर रोग होणार आणि रोग झाल्यावर डॉक्टरकडे जावेच लागणार. दवाखान्यात गेल्यावर औषधे घ्यावीच लागणार. तेव्हा दवाखान्याला देऊळ मानावे. डॉक्टरला देव मानावे व औषधाला मित्र मानावे. वैरी मानू नये.

आपले आयुष्य दुःखमुक्त करणारे, संपणारे आयुष्य सुखकर करणारी औषध यांना मित्रच मानावे. पण आपली जिव्हा, जीभ त्या औषधाला वैरी मानते. ज्ञानराज म्हणतात-

पाहे पा आयुष्याचा अढळ करी। जे सरते जीवित वारी।
तया औषधाते वैरी। काय जिव्हा न म्हणे।।

आपली जीभ औषधाला वैरी का मानते, याचे कारण एकच. सारी औषधे,चूर्ण, रस, गोळ्या चवीने फार कडू असतात. कडूपणा जिभेला आवडत नाही. पण आरोग्य हवे असेल तर कडू औषधे घ्यावी.

की औषधाचिया कडुवटपणी। जैसी अमृताचि पुरवणी।
ते आहाच न दिसे परी गुणी। प्रकट होय।।

कडू औषधात अमृत असते ते दिसत नाही, पण औषधाच्या गुणातून ते प्रकट होते. असे असले तरी कडू औषधे कुणालाही आवडत नाहीत. कडू औषधे खाणे दुःखाचे वाटते. चमचमीत, तिखट, खारट, गोड खाणे सर्वांना सुखाचे वाटते. याचे कारण ज्ञानराज सांगतात-

जो रसनेंद्रियांचा अंकिला। कां निद्रेसी जिवे विकला।
तो नाही एथ म्हणितला। अधिकारिया।।

सर्वच जिव्हेचे वेडे असतात. जे सतत झोप घेतात. त्यांना स्वास्थ्य, योग, आरोग्य मिळत नाही. डॉक्टर अनेक पथ्ये सांगतात. अन्न थोडे थोडे खावे. हळू हळू चालावे, हळू हळू कमी बोलावे. झोपसुद्धा थोडी घ्यावी. ज्ञानराजही असेच म्हणतात-

मितला बोली बोलिजे। मितलिया पाऊली चालिजे।
निद्रेही मानूं दिजे। अवसरे एके।।

पथ्याबरोबरच माणसाने मनही प्रसन्न ठेवावे. मन प्रसन्न असेल तर शरीरालाही दुःख होत नाही. तहान भूक, रोग, दुःखाची बाधा होत नाही. ज्ञानराज सांगतात-

देखे अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



तेथ रिघणे नाही समस्ता। संसार दुःखा।।

आपले शरीर अन्नमय आहे. जीवंत राहण्यासाठी अन्न खावेच लागते. अन्न हे ब्रह्मरुप आहे. अन्नरसांच्या सेवनाशिवाय शरीर जीवंत राहणे अशक्य आहे. आपण जे अन्न खातो, ते शरीराला हितकारी असावे. आपण जे अन्न खातो ते सात्विक, पवित्र, सुपक्व, पौष्टिक असावे. सात्विक आहार सेवनाने शरीर प्रकृती उत्तम राहते व राजस, तामस, अपथ्यकारी अन्नसेवनाने शरीर रोगाचे कोठार बनते. अस्वास्थ्यामुळे शरीर, मन बेचैन होते. दुःख, शोक, रोग निर्माण करणारा आहार कसा असतो, हे ज्ञानराजाने सविस्तरपणे सांगितले आहे.

आज आहारशास्त्रज्ञ, डॉक्टर सांगतात त्यापेक्षाही स्पष्टपणे ज्ञानराज सांगतात-

ते आहार नव्हती घेतले। व्याधिजाळ ते सुतले।
ते चेववावया घातले। माजवण पोटी।।

शरीरात झोपलेले रोग जागे करण्यासाठी जो आहार घेतला जातो, तो कसा असतो? कडू, आंबट, खारट, फार उष्ण, तिखट, कोरडे, जळजळणारे, कच्चे, रसहीन, दुर्गंधीयुक्त, शिळे आणि उष्टे अपवित्र अन्न असते, त्याचे भोजन दुःखकारक असते. ज्ञानराज सांगतात-

कणिकीते जैसे पाणी। तैसेचि मीठ बांधया आणी।
तेतुलीच मेळवणी। रसांतराची।।

काळाकुट्ट विषाप्रमाणे कडू, चुन्यापेक्षा आंबट, जिभेला चटका देणारे आम्ल तसेच खारट किती तर कणिकेचा गोळा करण्यास जेवढे पाणी लागते तितकेच मीठ त्यात घालतात. उन, गरम इतके की अग्नीच पोटात घालतात. ज्ञानराज सांगतात-

परस्परे दातां। आदळु होय खातां।
तो गा तोंडी घेतां। तोषो लागे।।

जे पदार्थ खाताना दात एकमेकांवर आदळतील, असे आंबट पदार्थ खाताना त्याला खूप आनंद होतो. आजारी पडल्यानंतरच शहाणपणा येतो. मग ज्ञानराज सांगतात ते मनाला पटते.

ऐसा न पुरोनि तोंडां। जिभा केला वेडा।
अननमिषें अग्नि भडाडां। पोटी भरें।।

हे झाले आजारी पाडणारे, रोग उत्पन्न करणारे भोजन. मग आपण आरोग्य चांगले राहण्यासाठी कोणते अन्न सेवन करावे? आपले आयुष्य, सत्व, बळ, आरोग्य, सुख, प्रीती निर्माण करून वाढविणारे, सुरस, स्निग्ध, शरीरास उपयुक्त, मनास आनंद देणारा आहार घ्यावा. ज्ञानराज अशा आहाराचे वर्णन करताना म्हणतात-

आकारे नव्हती डगळे। स्पर्शे अति मवाळे।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

जिभेलागी स्नेहाळे। स्वादे जिये।।

जे पदार्थ स्वभावतःच चांगले रसयुक्त असतात, जे पदार्थ, फळे, धान्य मूळचेच गोड असतात, स्निग्ध आणि सुपक्व असतात. जे आकाराने बेढब नसतात. स्पर्शाला मऊमऊ असतात आणि जिभेला चवदार वाटतात, हा आहार दिसायला थोडा दिसतो. पण शरीरात गेल्यावर बळ, आरोग्य आणि तृप्ती मिळते. चवीने गोड आणि शरीराला हितकर, उपयुक्त आहार घ्यावा.

लग्नसमारंभ, दवाखाना याशिवाय इतर अनेक ठिकाणी आणि अनेक प्रसंगांत ज्ञानेश्वरीच्या ओव्या सहज आठवतात. अनेक गरीब लोकांना खोटी आमिषे दाखवून, लुबाडून, लाखो रुपये गोळा करून दूर परदेशात पळून गेलेले आधुनिक लुटारू असतात. सामान्य, भोळा, गरीब माणूस, आपण ज्याला पैसे देत आहोत, तो माणूस किंवा कंपनी विश्वासार्ह आहे की नाही हे न पाहता आपल्या जवळचे भांडवल विचार न करता धूर्त आणि चोर माणसाच्या हाती देतात. असे प्रसंग सतत घडत असतात. अशा वेळी ज्ञानेश्वरीची ओवी आठवते.

कां दिधले मागुती येईल। कीं न ये हें पुढील।
न पाहतां दे भांडवल। मूर्ख चोरां।।

रक्कम दुप्पट होईल या आशेने लोक फसतात व आपण दिलेले पैसे परत येतील की नाही, याचा काहीही विचार न करता आपले लाखो रुपये चोराला देऊन मूर्ख ठरतात. वाढदिवस समारंभप्रसंगी आनंद, उत्साहाने सहभागी होताना ज्ञानेश्वरीची ही ओवी सहज आठवते. ज्ञानराज म्हणतात-

जन्मलिया दिवस दिवसें।
हों लागे काळाचियाची ऐसें।
की वाढती करिती उल्हासे।
उभविती गुढिया।।

या मृत्यूलोकात लोक उलटे वागतात. जसजसे बाळ मोठे होऊ लागते, तसतसे त्याचे आयुष्य कमी होत आहे, हे विसरून वाढदिवस आनंदाने, उत्साहाने साजरा करतात. या मानवी स्वभावाचे नवल वाटते. ज्ञानराज म्हणतात-

जंव जंव बाळ बळिया वाढे। तंव तंव भोजें नाचती कोडें।
आयुष्य निमालें आंतुलियेकडे। ते ग्लानिची नाही।।

विविध प्रसंगी ज्ञानेश्वरीच्या ओव्यांचे सहज स्मरण करून देणाऱ्या ज्ञानराजांना वंदन!!

- नामदेव सदावर्ते,
पसायदान, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



प्रसाद

प्रसाद म्हणजे काय? संस्कृतमध्ये प्रसाद म्हणजे नैराश्यहरण असे आहे. द्वैत संप्रदायाच्या मताप्रमाणे प्रसाद म्हणजे मुक्तीचे अंतिम कारण. शैव संप्रदायाप्रमाणे प्रसाद म्हणजे सुरक्षा आवरण होय. दोन्ही मते व अर्थ यांचे तौलनिक अवलोकन केले असता एकच अर्थ पण भिन्न पद्धतीने सांगत असल्याचे दिसते. नैराश्य हरण होणे म्हणजे नित्यानंदी राहणे. मुक्तीचे अंतिम कारण म्हणजे भवबंधनातून मुक्त होऊन नित्यानंदी होणे.

-बंडोपंत कुलकर्णी

प्रसाद हा शब्द आपण ऐकून आहोत. जसे मंदिरात जाताना, गुरूदेव अगर महात्म्यांचे दर्शन घेण्यासाठी जाताना सोबत त्यांना अर्पण करण्यासाठी फळे अथवा काहीतरी घेऊन जातो. जेव्हा ते अर्पण केले जाते तेव्हा त्याचे स्वरूप बदलते. तेव्हा ती फळे अथवा वस्तू राहत नाहीत, तर ते प्रसाद होतात. फळे तीच, वस्तू तीच, मग ते प्रसाद का होतात. कोणी आजारी असेल तर सद्भावनेने त्यांना भेटण्यासाठी व त्यांचे आरोग्य चिंतण्यासाठी त्यांना भेटण्यासाठी जातो. त्यावेळीही आपण त्यांच्यासाठी फळे अगर काहीतरी घेऊन जातो. त्यांना ती फळे वा वस्तू दिल्यावर वा त्यांनी त्याला स्पर्श केल्यावर त्या फळांना प्रसाद म्हणत नाहीत. यावरून एक लक्षात येते की फळे अगर वस्तूंचा संबंध नसून ती कोणत्या ठिकाणी जातात याला महत्त्व आहे. कारणपरत्वे भावनेला महत्त्व आहे. म्हणून प्रसाद ग्रहण करताना भक्तीभाव हवा. कारण प्रसाद हा भक्तांसाठी असतो तर सामान्य लोकांसाठी ते एक खाद्य वा अन्न असते.

प्रसाद म्हणजे काय? संस्कृतमध्ये प्रसाद म्हणजे नैराश्यहरण असे आहे. द्वैत संप्रदायाच्या मताप्रमाणे प्रसाद म्हणजे मुक्तीचे अंतिम कारण. शैव संप्रदायाप्रमाणे प्रसाद म्हणजे सुरक्षा आवरण होय. दोन्ही मते व अर्थ यांचे तौलनिक अवलोकन केले असता एकच अर्थ पण भिन्न पद्धतीने सांगत असल्याचे दिसते. नैराश्य हरण होणे म्हणजे नित्यानंदी राहणे. मुक्तीचे अंतिम कारण म्हणजे भवबंधनातून मुक्त होऊन नित्यानंदी होणे. सुरक्षा आवरण म्हणजे संसार सागरात पडल्यावर त्याला सुरक्षित करणे म्हणजे संसार सागरातून तारून नेत नित्यानंदी करणे. प्रसाद हा मनुष्याला नित्यानंदी बनवितो. हा झाला प्रसादाचा परिणाम. मग प्रसाद स्वरूप काय? माझ्या मते प्रत्येक गोष्ट वा घटनेला सुरुवात असते.

शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी।।

असे संतांनी आपणास सांगितले आहे. शुद्ध बीज तो परमात्मा व फळे रसाळ गोमटी म्हणजे सर्व जीव होय. जन्मतः सर्व आनंदी असतात. म्हणून संत म्हणतात,

बालपण देगा देवा। मुंगी साखरेचा मेवा।।

जसे जसे वय वाढत भौतिक व लौकिक सज्ञान होत देहाने वाढत जाऊन संसार सागरात उतरायला सुरुवात केली की, नैराश्य व दुःखाची जाणीव होण्यास प्रारंभ होतो. म्हणजे येथे दुःख सुरू होते. वर नमूद अर्थ व मत याची सांगड संसारबंधनास घालता जेथे बंधन व दुःख सुरू झाले, त्या क्षणापूर्वीची अवस्था प्रसाद होय, असे माझे मत आहे.

शैव सांप्रदायामध्ये अष्टआवरणे सांगितली आहेत. गुरू, लिंग, जंगम, विभूती किंवा भस्म, रुद्राक्ष, पदोदक, प्रसाद, मंत्र हे अष्ट आवरण. यात प्रसाद हे एक आवरण आहे. आवरण विचारात घेतल्यास प्रसादाचा अन्य अर्थ कृपा होतो. नैराश्य हरण व पूर्णानंद प्राप्त होणे ही कृपाच आहे. मराठी अभिजात भाषेत याला आणखी सोपे करायचे म्हंटले, तर ज्या क्षणी जीव जन्म घेण्यास तयार होतो, त्याला परमात्मा आत्मरूपाने प्रथम प्रतिसाद देतो व जीवात्मा सर्व सनातन गुणांसह जन्म घेतो. प्रथम साद दिलेल्या अवस्थेत घेऊन जाते त्याला प्रसाद म्हंटले तर वावगे होईल असे वाटत नाही. कारण ती अवस्थाही पूर्णानंद अवस्था आहे.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

संत वाङ्मयात, प्रसाद म्हणजे संतकृपेचा आशीर्वाद, ज्ञानाचे अन्न आणि भक्तीचा अमृतकलश आहे. मंदिर वा पवित्र स्थळी अथवा सद्गुरू महात्मे यांच्याकडे गेल्यावर अन्न वा खाद्य रूपात प्राप्त होतो तो प्रसाद असतो. ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरीत प्रसाद हा भगवंत दर्शन आणि भक्तियोग होय. भगवंतकृपा आणि त्यातून प्राप्त ज्ञान म्हणजे प्रसाद असे तुकाराम महाराज म्हणतात. संतांचा उपदेश, ज्ञान आणि अनुभव हा सर्वात मोठा प्रसाद मानला जातो. संतकृपा ही भक्तांच्या जीवनातला सर्वात मोठा प्रसाद आहे. रामदास स्वामींच्या अभंगात प्रसाद म्हणजे भगवंतभक्ती आणि राष्ट्रसेवा असे सांगितले आहे. संत वाङ्मयात प्रसादाचे महत्त्व अनेक कारणांमुळे आहे. प्रसाद म्हणजे आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग, प्रसाद म्हणजे मोक्षाचा मार्ग, प्रसाद म्हणजे जीवनाला सार्थकता प्राप्त करणे. संत साहित्यातील प्रसाद हा केवळ भौतिक वस्तूपुरता मर्यादित नाही. तो ज्ञान, भक्ती, कृपा आणि मोक्षाचा मार्ग आहे. संतवचन ऐकून व साहित्य वाचून आपण प्रसादाचा खरा अर्थ समजून घेऊ शकतो आणि आपल्या जीवनात त्याचा अवलंब करून आनंद आणि शांती प्राप्त करू शकतो. उदाहरण म्हणून संत एकनाथ महाराज यांचा अभंग इतर सर्व संतांच्या अभंगाचा सार म्हणून पाहता येईल.

पावलों प्रसाद। अवघा निरसला भेद।।
द्वैताद्वैत दूर ठेलें। एकपणें एक देखिलें।।
जन वन समान दोन्हीं। जनार्दन एकपणीं।।
एका जनार्दनीं लडिवाळ। म्हणोनि करावा सांभाळ।।

प्रसाद प्राप्त होता मन आणि नजरेतील भेद संपुष्टात येतो. म्हणजे जीव वैष्णव होतो.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद-भ्रम अमंगळ।।

येथे संत तुकोबाराय प्रगट होतात. त्यानंतर द्वैताद्वैत दूर ठेले म्हणजे तो परमात्मा एकच आहे.

चिदानंद रुप चेतवितें एक। एकपणें गुणागुणीं दावी अनेक।।

येथे माउली व्यक्त होते. जन वन समान दोन्हीं म्हणजे संपूर्ण त्रिभुवन हे हरी व्याप्त आहे.

संकर्षण गंगा सर्वांगीं तूं असे। जनीं वनीं दिसे रूप तुझें।।

येथे संत नामदेव महाराज दृश्य होतात. ईश्वर हा प्रत्येक जीव हा ईश्वराचा लडिवाळ असतो. कारण तो त्याचाच अंश आहे. हेच जनाई सांगते.

विठु माझा लेंकुरवाळा। संगें गोपाळांचा मेळा।।

येथे जनाई रूपक रूपात दाखविते.

संत विचार व शिकवण पाहता ईश्वर वा सद्गुरू यांच्या कृपेने नैराश्य हरण करून पूर्णानंद प्राप्त होतो व ती प्राप्त करून देण्याची अवस्था म्हणजे प्रसाद होय. म्हणून फळे मंदिर अथवा सद्गुरू व महात्म्यांना अर्पण केल्यावर पूर्णानंदाच्या कटाक्ष स्पर्शाने त्या फळांना अंतिम अवस्था प्राप्त होऊन त्यांच्यातील गुण त्यात उतरल्याने ती प्रसाद होतात. संत याला उच्चिष्ट म्हणतात. संत म्हणतात,

आरुष माझी वाणी बोबडीं उत्तरें। केली ते लेकुरें सलगी पायीं।।
करावें कवतुक संतीं मायबापीं। जीवन देउनि रोपीं विस्तारिजे।।
आधारें वदली प्रसादाची वाणी। उच्छिष्ट सेवणी तुमचिया।।
तुका ह्मणे हेचि करितों विनंती। मागोनि पुढती सेवादान।।
आत्मा मालिक। कृष्णार्पणमस्तू ।

-बंडोपंत कुलकर्णी,
सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, पुणे

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



ज्ञानेश्वरीतील 'आत्मा' दर्शक सौंदर्यस्थळे-भाग २

शरीर लोपते, स्वरुपी नाश नव्हे

जीर्ण-जुने-विरलेले वस्त्र जसे माणूस टाकून दुसरे नवीन वस्त्र परिधान करतो, तसेच देहांतर आहे. देहात बदल घडून येतो. आत्मा तर तोच असतो. शस्त्र तोडू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, वारा शोषण करू शकत नाही, असाच हा आत्मा नित्य सत्य, निरुपाधि, विशुद्ध असा आहे! शस्त्र नाही नष्ट करू शकत आत्म्यासी!

-डॉ. सुनील शिंदे

माया जीवाला भ्रमात टाकते, टाकू पाहते तेंव्हा भ्रमाच्या आहारी जावे, न जावे, अलिप्त कसे असावे हे सर्वस्वी त्या जीवावर अवलंबून आहे. माउली संत ज्ञानोबाराय दाखवला असा समर्पक देतात की, जसे कुंभ पूर्णपणे उपडा होत्साता तेथे बिंबाकार भ्रंश दिसो येईल; तथापि त्याचे संगती तेजोभास्कर सूर्य मात्र अस्तित्वहीन नाही होऊ शकत किंवा मठाकृती आकाश हा मूळीचा असतो भास आणि तो भंग पावला तरी मूळ रुप तर नाही अलिप्त होऊ शकत. अगदी शरीराचेदेखवील तसेच की! शरीर नष्ट होते, लोप पावते; मात्र आत्मा, तो तर अजर आहे, अविनाशी आहे, स्वरुपी नष्ट कसा होऊ शकेल? याच न्यायाने भ्रांती विचारात घ्यावी लागते. यासाठी गीतेतला दाखवला देताना माउली निर्देशच करतात-

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि
संयाति नावानि देही।।

जीर्ण-जुने-विरलेले वस्त्र जसे माणूस टाकून दुसरे नवीन वस्त्र परिधान करतो, तसेच देहांतर आहे. देहात बदल घडून येतो. आत्मा तर तोच असतो. शस्त्र तोडू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, वारा शोषण करू शकत नाही, असाच हा आत्मा नित्य सत्य, निरुपाधि, विशुद्ध असा आहे! शस्त्र नाही नष्ट करू शकत आत्म्यासी! याविषयी नेमकेपणाने-अचूक-साधार निरुपण करताना माउली ज्ञानदेव म्हणतात-

तैसी हे जाण माया। तूं भ्रमत आहासी वायां।
शस्त्रें हाणितलिया छाया। जैसी आंगी न रुपे।।१४०।।
कां पूर्ण कुंभ उलंडला।
तेथ बिंबाकारु दिसे भ्रंशला।
परी भानु नाहीं नासला।
तयासवें।।१४१।।
ना तरी मठीं आकाश जैसें।
मठाकृती अवतरले असे।
तो भंगलिया आपैसे।
स्वरूपचि।।१४२।।
तैसें शरीराचां लोपीं।
सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

म्हणऊनि तूं हें नारोपीं।
भ्रांति बापा।।१४३।।
वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि
संयाति नावानि देही।।२२।।
जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे।
मग नूतन वेढिजे।
तैसे देहांतराते स्वीकारिजे।
चैतन्यनाथें।।१४४।।
नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।।२३।।
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्य सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।।२४।।
हा अनादि नित्यसिद्धु। निरुपाधि विशुद्धु।
म्हणऊनि शस्त्रादिकीं छेदु। न घडे यया।।१४५।।

अत्यंत समर्पक, यथोचित दाखले माउली देतात. आत्म्याचे अविनाशत्व उलगडून दाखवतात, सिद्ध करतात. आत्मादर्शक सौंदर्य स्थळे समजावून देतात, अनादि-नित्यसिद्ध असलेला असा हा विलक्षण आत्मा आहे. आत्मबोध मोलाचा. आत्मबोधाने समाधान पावणे त्याहून अनमोल. परमानंद होणे हे ओघाने आले. अहंकार लोप पावतो, विकारांचा विनाश होतो. विश्वस्थित अवस्था प्राप्त होणे हे आत्म्याचे विशेष रुप. ब्रह्मस्थिती तर निःस्सीम असते. निष्काम भावनेने परब्रह्म अनुभूती लाभते ही केवढी उपलब्धी. यासंदर्भात माउली सांगतात-

ऐसा आत्मबोधें तोषला।
जो परमानंदें पोखला।
तोचि स्थिरप्रज्ञु भला। वोळख तूं।।३६६।।
तो अहंकाराते दंडुनी। सकळ काम सांडोनि।
विचरे विश्व होऊनि। विश्वाचिमाजीं।।३६७।।
एष ब्राह्मो स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।
स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति।।७२।।
हे ब्रह्मस्थिती निःसीम। जे अनुभवितां निष्काम।
पातलें परब्रह्म। अनायासें।।३६८।।

स्वरुपासी नाश मुळीच नाही, असा हा आत्मा अमर, अजरामर, अतुलनीय, असामान्य अन् अविनाशी. माउली अशा अनेक प्रतिकांतून आत्मा तत्वाची सौंदर्य स्थळे नजरेस आणतात.

- डॉ. सुनील शिंदे
'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
बी विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



ईश्वराचे नामस्मरण

संत ज्ञानेश्वर, संत जगद्‌गुरु तुकाराम महाराज व अनेक संतांनी ईश्वरनामाचा अगाध महिमा वर्णिला आहे व भगवंताचे नित्य नामस्मरण करण्यासाठी तळमळीने सांगितले आहे. त्यासाठी कोणत्याही वस्तूची गरज नसते. अंत:करणी दृढ भक्तिभाव पाहिजे. श्री समर्थ रामदास स्वामी श्रीरामाचे परमभक्त होते. त्यांनी आपल्या पूर्व आयुष्यात गोदावरीतटी अखंडित श्रीरामाचा जप केला. प्रासादिक 'श्री मनाचे श्लोक' व 'दासबोध' यामधून त्यांनी श्री रामनामाचा महिमा सांगितला आहे. मनुष्याने जीवनात शाश्वत सुख, आनंदप्राप्तीसाठी मन:पूर्वक, भक्तीने नामस्मरण करावे.

- बी. के. गायकवाड

मनुष्याचे जीवन एक संघर्ष व आव्हान असते. ते जीवाला गर्भावस्थेपासून मृत्यूपावेतो पेलावे लागते. मुळातच ८४ लक्ष योनींमधून प्राप्त झालेला हा मनुष्यदेह अत्यंत दुर्लभ आहे. हा देह मिळाला असता मनुष्याने जीवाचे कल्याण करावे व आपला आत्मोद्धार करून घ्यावा, असे संत सांगतात. त्यासाठी साधू-संतांच्या चरणी अनन्य भावे शरण जावे. संतसंगती व संतसहवास यामधून श्रीगुरूंची भेट होते व त्यांचा अनुग्रह मिळतो. श्रीगुरूंच्या मार्गदर्शनाने मुमुक्षू भक्ताच्या अंत:करणांत भगवंत प्रेम, ईश्वरभक्तीची आवड निर्माण होते.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली सांगतात, श्रद्धापूर्वक केलेल्या भक्तीतून ईश्वराची प्राप्ती होते. महर्षी नारदांनी वर्णिलेल्या नवविधा भक्तीत श्रवण, कीर्तनाबरोबर नामस्मरणास विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

भगवंताच्या नामासंदर्भात संत ज्ञानेश्वरांनी आपले गुरुबंधू श्री निवृत्तीनाथांना विचारणा केली असता ते म्हणाले, 'नाम गगनाहुनी वाढ आहे.' ईश्वर नामाचा महिमा संत ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांचे हरिपाठातून वर्णिला आहे.

रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा।
आत्मा जो शिवाचा राम जप।।
एकतत्त्व नाम साधिति साधन।
द्वैताचे बंधन न बाधिजे।।
नामामृत गोडी वैष्णवा लाभली।
योगिया साधली जीवन कळा।।
ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान।
नामपाठे मौन प्रपंचाचे।।
नाम संकीर्तन वैष्णवांची जोडी।
पापे अनंत कोडी गेली त्यांची।।
अनंत जन्माचे तप एक नाम।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।

प्रापंचिक मानवाला ईश्वरभक्तीची गोडी लागावी यासाठी हा सार्थ हरिपाठ आहे. आपल्या मनी ईश्वराप्रति अत्यंत दृढ भक्तीभाव पाहिजे. कारण 'परमात्मा भावाचा भुकेला' असे म्हटले आहे. यासाठी देवाच्या बाह्यपूजेपेक्षा मानस पूजेतून केलेले ईश्वराचे नामस्मरण अधिक श्रेयस्कर होते.

संत ज्ञानेश्वर, संत जगद्गुरु तुकाराम महाराज व अनेक संतांनी ईश्वरनामाचा अगाध महिमा वर्णिला आहे व भगवंताचे नित्य नामस्मरण करण्यासाठी तळमळीने सांगितले आहे. त्यासाठी कोणत्याही वस्तूची गरज नसते. अंत:करणी दृढ भक्तिभाव पाहिजे. श्री समर्थ रामदास स्वामी श्रीरामाचे परमभक्त होते. त्यांनी आपल्या पूर्व आयुष्यात गोदावरीतटी अखंडित श्रीरामाचा जप केला. प्रासादिक 'श्री मनाचे श्लोक' व 'दासबोध' यामधून त्यांनी श्री रामनामाचा महिमा सांगितला आहे. मनुष्याने जीवनात शाश्वत सुख, आनंदप्राप्तीसाठी मन:पूर्वक, भक्तीने नामस्मरण करावे. मनाच्या श्लोकांमधून ते म्हणतात -

सदा सर्वदा नाम वाचे वसो।
अहंता मनी पापिणी ते नसो दे।।२४।।
सदाशिव चिंततसे देव देवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा।।७३।।
जनी भोजनी नाम वाचे वदावे।
अति आदरे गद्य घोष म्हणावे।
हरि चिंतने अन्न सेवित जावे।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे।।८९।।

श्री समर्थ रामदास स्वामी श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू होते.

श्री समर्थ रामदास स्वामींच्या शिष्य परंपरेमधील एक शिष्य (इ. स. सन १८४५ ते १९१३ या) कालखंडात श्रीक्षेत्र पंढरपूरनजीक गोंदवले ग्रामी प. पू. ब्रह्मचैतन्य श्री गोंदवले महाराज यांनी आपल्या संपूर्ण जीवनकाळात लोकांना ईश्वराच्या नामाचे व नामस्मरणाचे महत्त्व सागताना म्हटले, भगवंताचे नाम हे ईश्वराचे सगुण स्वरूप आहे. नाम हे ईश्वरी तत्व आहे. तेच निर्गुण निराकार ईश्वराच्या आत्मरुपाशी ऐक्य होईल. श्री रामनामाचे भक्तीपूर्वक नित्य स्मरण करावे.

ओंकार हेच माझे एकाक्षर ब्रह्मस्वरूप होय. या माझ्या स्वरूपाचे चिंतन करीत जो हा जड देह सोडतो. तो माझ्या स्वरूपाला पावतो.

- ज्ञानेश्वरी अध्याय ८, गीता श्लोक १३

वाल्या कोळ्याने नारदमुनींच्या सांगण्यावरून अखंड श्रीरामनामाचा जप केला व त्यांचा उद्धार होऊन ते वाल्मिकी ऋषी झाले व त्यांनी पुढे श्रीरामायण लिहिले. हनुमंतांनी श्रीरामाला नित्य अंत:करणी स्मरून दास्य भक्ती केली व ते चिरंजीव झाले.

ओंकार हे अक्षरब्रह्म स्वरूप नाम आहे. यातील ही अ, ऊ, म ही अक्षरे ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिदेवांचा नामनिर्देश करतात. त्यावरील अर्धचंद्राकित बिंदूस्वरूप शक्तीरूपाचे प्रतीक आहे. कोणत्याही देवतेच्या मंत्रात प्रथम ॐ नामाचे स्मरण होते. संत ज्ञानेश्वर माऊली ओंकार स्वरूप श्री गणेश देवाचे रूप हे आत्मदेवाचे स्वरूप असल्याचे सांगतात. सर्व कार्यारंभी प्रथम श्री गणेशाचे नामस्मरण करण्यात

येते.

श्री दत्तात्रयांचे स्मरण करताच भक्ताच्या हाकेला तत्काळ धावून येतात व संकट निवारण करतात. श्रीगुरू हे ब्रह्मस्वरूप आहेत. गुरूंच्या स्वरूपाचे ध्यान, गुरूचरणांची पूजा, गुरूंनी दिलेला नाममंत्र याचे भक्ताने श्रद्धा व भक्तीने स्मरण करून गुरुआज्ञा पालन केल्याने मुमुक्षू भक्ताला मोक्षाची प्राप्ती म्हणजेच श्री गुरुकृपा होते.

ध्यान मूलं गुरुर्मूर्ती, पूजा मूलं गुरुपदं।
मंत्र मूलं गुरुर्वाक्यं, मोक्ष मूलं गुरुकृपा।।११।।

-गुरुगीता, अध्याय ४९

श्रीगुरू आपल्या भक्तांना सांगतात, हृदयात देवाचे नामस्मरण करीत आपल्या वाट्याला आलेली विहित कर्मे करावीत. त्याची फलाशा न ठेवता व कर्तेपणाचा अहंकार न बाळगता ती ईश्वरास समर्पित करावीत. अशा निष्काम कर्माचरणाने ती जीवाला बंधनकारक होत नाहीत, तर जीवन्मुक्त म्हणजेच मोक्षास सहाय्यभूत होतात.

प. पू. सद्गुरू आत्मा मालिक यांनी भक्तांसाठी दिलेल्या अनुष्ठानांत लघु, नाम, जपानुष्ठान, रूप चिंतन ज्ञानानुष्ठान स्वरूप समाधी महानुष्ठाने आहेत. नित्य ईश्वर नामस्मरणाचे अंतिम ध्येय आहे भगवंताची प्राप्ती.

संत परमानंद महाराज लिखित अवतारलीला आत्मस्वरूपाची (नित्य नियम साधना) यात सांगितले आहे.

आत्मा आहे निराकार। हृदयी पाहावा लागे आकार।
निराकाराचे चिंतन आकाराते। तयाचे नाव असे ध्यान।

- अध्याय ३, ओवी ६७

श्री गुरु आज्ञे आत्मचिंतनाकरिता।
ओळख स्वस्वरूपाची होतसे।
आत्मदर्शन घडवोनी।
आद्य गुरु स्वस्वरूपी पोहचवतसे।।

- अध्याय ४, ओवी २१

आपल्या हृदय मंदिरात असलेल्या निराकार आत्म्याचे सगुण आकारात केलेले आत्मचिंतन म्हणजे ध्यान. श्रीगुरु आज्ञेने ध्यानातून केलेल्या आत्म्याच्या चिंतनाने स्वस्वरूपाची ओळख होऊन आत्मदर्शन होते व श्रीगुरू आपणास स्व रूपात विलीन करतात. जय आत्मदेव!

संदर्भ : सार्थ हरिपाठ, मनाचे श्लोक, अवतारलीला आत्मस्वरुपाची (नित्य नियम साधना)

-बी. के. गायकवाड,
प्लॉट क्र.५, नव महाराष्ट्र को. ऑप.
हौसिंग सोसायटी, सातारा रोड,
अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९
मो. नं. ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

|| श्री महाशिवरात्री पर्वस्नान ||

दि. २६ फेब्रुवारी, माघ वद्य त्रयोदशीला विश्वात्मक जंगली महाराज आश्रम, आत्मा मालिक ध्यान योग मिशन, चैत्यनपुरी, कोकमठाण येथे प. पू. सद्गुरू, सर्व संत, विश्वस्त, शिक्षक, विद्यार्थी आणि हजारोंच्या संख्येने आलेल्या आत्मप्रेमी भाविकांच्या उपस्थितीत महाशिवरात्री शिवपूजन व पर्वस्नान उत्साहात झाले.

पहाटे ब्रह्ममुहुर्तावर आश्रमातील आत्मेश्वर कुटीर येथे महाशिवरात्री उत्सवानिमित्त श्रीगणेश वंदन करून श्री आत्मेश्वर परब्रह्म पूजा, पाद्यपूजा आणि शिवपूजन झाले.

'ॐ आत्मस्वरुपाय विद्महे

महादेवाय धीमहि । तन्नो रुद्र प्रचोदयांत।'

देवाधिदेव महोदव, आत्मेश्वर शिवलिंग रुद्राभिषेक पूजनाने पूजा झाली. आत्मदेवाची आरती झाली. सकाळी ठिक ९ वाजता आश्रमातून भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला. भाविक रांगेतून, जलकुंभ घेऊन आत्मदेवाच्या पालखीसह दिंड्या-पताका हाती घेऊन, वाद्यवृंदाच्या गजरात भजने म्हणत. संत, विश्वस्त, शिक्षक समवेत होते. तासाभराने दिंडी सोहळा इंटरनॅशनल स्कूल प्रांगणानजीक आला. दतर्फा शिक्षक विद्यार्थी स्वागतासाठी उभे होते. प. पू. सद्गुरु माऊलींचे आगमन झाले. आत्मा मालिक जयघोषात दिंडी येथील प्रांगणात असलेल्या जलतरण तलावानजीक पर्वस्नानासाठी आली.

जलतरण तलावकाठी सर्व भक्त मांदियाळी स्थिरावली. प. पू सद्गुरुंच्या व संतांच्या उपस्थितीत आत्मदेव पूजन झाले. श्री सद्गुरुंची पाद्यपूजा झाली. ध्यान झाले. आत्मदेवाची आरती झाली.

संत परमानंद महाराज म्हणाले 'प्रयाग त्रिवेणी संगम गंगा यमुना सरस्वती त्रिवेणी संगमावर मागील दीड महिना महाकुंभमेळा मोठ्या उत्साहात झाला. कोट्यवधी भारतीयांनी या कुंभमेळयात हजेरी लावून गंगास्नानाचा आनंद घेतला. आज महाशिवरात्र आहे. कुंभमेळ्याची सांगता होत आहे. प. पू. सद्गुरुमाऊली यांनी आजच्या महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर आत्मा मालिक परिवारातील सर्व भाविकांना या जलतरण तलावाच्या पावन जलाशयावर महाशिवरात्रीच्या पर्वस्नानासाठी आणले आहे. या जलतरण तलावाच्या निर्मितीवेळी प. पू. सद्गुरुंनी स्वतः लक्ष देऊन काम पूर्ण करुन घेतले. भाविकांना यापुढील काळातही महाशिवरात्रीचे पर्वस्नान करण्याचा आनंद घेता येईल. प्रयाग येथे जाऊन आलेल्या भाविकांनी आणलेले तेथील पवित्र जल प. पू. सद्गुरुंनी स्पर्श करून व पूजा करून जलतरण तलावात सामाविण्यात आले. त्यामुळे या तलावाला गंगेचे पवित्र स्वरूप प्राप्त झाले आहे.ज्या भाविकांना प्रयाग येथील कुंभमेळ्याला जाणे शक्य झाले नाही, अशा आलेल्या व इतर सर्व भाविकांसाठी येथे पर्वस्नानाची सोय करण्यात आली आहे. प. पू. सद्गुरु ही विश्वाची आत्मरुप माऊली आहे. जगत कल्याणाचे विश्वात्मक कार्य, सत्य निजस्वरुप आत्म्याची ओळख करुन देण्यासाठी अखंडितपणे चालू आहे. आत्मा हाच ईश्वर आहे व आत्मपूजा हीच ईश्वरपूजा आहे. ध्यानातून आत्मचिंतन करा, आत्म्यावर प्रेम करा. शाश्वत सुख समाधान व आनंद मिळेल. महादेवाचे आत्मलिंग शिवपूजन म्हणजेच परमात्मा स्वरुप आत्मदेवाची पूजा होय.

संत परमानंद महाराज पुढे म्हणाले 'प्रत्यक्ष परमात्मा स्वरुप प. पू. सद्गुरुंच्या चरण स्पर्शाने पावन झालेल्या तलावात पवित्र गंगाजल समर्पित केले आहे. पावन झालेल्या या जलतरण तलावाच्या

जलाशय तीर्थात भाविकांनी कुंभस्थानाचा, पर्वस्नानाचा लाभ घ्यावा. श्री गुरुंचे चरण हे सर्व तीर्थाचे तीर्थ आहे.

श्री गुरुंचे महात्म स्वयं श्री महादेवांनी जगतजननी शक्तीस्वरुप सौ. पार्वती मातेला गुरुगीतेतून सांगितले आहे.

सर्व पापविशुद्धात्मा, श्री गुरो पाद सेवनात।
देही ब्रह्म भवेद्यस्मात, तत्कृतार्थ वदामि ते।।११।।
गुरुपांदाबुज स्मृत्वा, जलं शिरसि धारयेत।
सर्व तीर्थावगाहस्य संप्राप्तोति फलं नरः।।१२।।
शोषणं पापङ्क्स्य, दीपनं ज्ञान तेजसाम,
गुरुपादोदकं सम्यक, संसारार्णवतारकम ।।१३।।
अज्ञानमूल हरणं जन्मकर्म निवारणं।
ज्ञानवैराग्य सिद्धर्थ्य, गुरुपादोदकं पिवेत ।।१४।।

- श्री गुरुचरित्र श्री गुरुगीताध्याय-४९

आश्रमातील सर्वांसाठी प्रसादभोजन कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले बाळासो गोरडे, विश्वस्त गिरमे व भट यांना आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने गुरुकृपाशीर्वादासह धन्यवाद दिले. संत परमानंद महाराज यांनी महाशिवरात्री पर्वावर अन्नदानासाठी समर्पित केलेल्या भाविकास धन्यवाद दिले.

उपस्थित भाविकांनी कुंभस्नानाचा आत्मिक आनंद घेतला. तद्नंतर इंटरनॅशनल स्कूलमध्ये भोजनालयात सर्वांसाठी महाशिवरात्री उपवासाचा प्रसाद फराळ देण्यात आला. आश्रमात परतल्यावर सर्व भाविकांनी सदगुरु माऊलींचे रांगेतून दर्शन घेतले. सायंकाळी हरिपाठ, किर्तनसेवा, आरती होऊन अत्यंत आनंदात, उत्साहात महाशिवरात्रीचा उत्सव पार पडला. आत्मा मालिक!

संकलन : बी.के. गायकवाड

प्लॉट क्र. ५, नवमहाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड, पुणे - ०९.
मो. नं. - ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



कुंभ

जैसे अभी वर्तमान कुंभ प्रसंग पर ध्यान दें, तो ऐतिहासिक खगोलीय परिस्थितियों की शुभ बेला में कुंभ का आगाज हुआ, पर समय काल और परिस्थितियों बस, यह बहुत ही विज्ञापित हो गया, हर व्यक्ति को यह विज्ञापित अवसर मिले ऐसा संभव नहीं है, पर अधिकांशतः इस ओर आस्था रखने वाले लोग पवित्र गंगा स्नान के लिए उत्साहित हो गये, जो जन सैलाब के रूप में हमारे सामने है।

-नरेश एवं नीता यादव

रहो शरण तुम आत्म के, दूज ना पक्का ठौर।
यही सत्य का राज है, और बाकी माया मौर।।

समस्त संसार जीवन लक्ष्यों से भरा हुआ है, बस जो जीवन को जितना समझा उतना और वैसा उसका लक्ष्य बना लेता है, कभी वह वास्तविक जीवन लक्ष्य से मेल खा लेता है, तो कभी विपरीत अवस्थाएँ बनी दिखाई देती है, जो आत्मिक या भौतिक हो जाती है, और इसका आत्मिक या भौतिक हो जाना, इस बात पर निर्भर करता है, की हम आत्मा के कितने निकट है। पर कभी कभी जीवन अचानक विज्ञापित वातावरण के कारण एक पक्षीय रूप से व्यक्ति को अलग़ तरह से अधिक ऊर्जावान कर देता है।

जैसे अभी वर्तमान कुंभ प्रसंग पर ध्यान दें, तो ऐतिहासिक खगोलीय परिस्थितियों की शुभ बेला में कुंभ का आगाज हुआ, पर समय काल और परिस्थितियों बस, यह बहुत ही विज्ञापित हो गया, हर व्यक्ति को यह विज्ञापित अवसर मिले ऐसा संभव नहीं है, पर अधिकांशतः इस ओर आस्था रखने वाले लोग पवित्र गंगा स्नान के लिए उत्साहित हो गये, जो जन सैलाब के रूप में हमारे सामने है। पर प्रकृति की अपनी सीमाएं हैं, उस पर अत्यधिक दबाव भी, हमारे लिए गंभीर परिस्थितियाँ पैदा कर सकता है, जो प्राकृतिक रूप से वरदान होते हुए भी, व्यक्तिगत रूप से किसी जीवन के लिए श्रापित वन सकता है, जैसा हमें भी, इस दरम्यान हुई कई धटनाओं में देखने मिला या मिल रहा है। वास्तव में मूल रूप से ये समय उन साधु संन्यासियों और तपस्वियों के लिए अति महत्वपूर्ण समय है जो इसमें निहित लक्ष्य के लिए लंबे समय से इंतज़ार कर रहे होते हैं, पर हम सभी उनके स्थान के बराबरी में इतनी भीड़ पैदा कर देते हैं, कि उस प्राकृतिक सम्पन्नता को भौतिक रूप से कई रूपों में नर्क जैसा बना देते हैं ।हमें यह ध्यान रखना आवश्यक है कि यदि अनुकूलता की कमी है तो संयम से काम लें, परिस्थितियां बने तो अवश्य ही अवसर का लाभ लें, पर जब प्रकृति और जीवन पर बन आए तो हम जहाँ वैठे है, वहीं उपलब्ध गुरु कृपा में आत्मिक ध्यान कुंभ का आनंद ले सकते हैं, कुछ पंक्तियाँ इस हेतु ध्यान प्रेरणा से लिखी गईं है, कृपया गौर करें:

आत्मिक कुंभ
आओ पुण्य कमाते हैं,

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

घर में कुम्भ मनाते हैं,
प्रेम अपनत्व आनंद की,
त्रिवेणी में सबके संग,
स्वयं की डुबकी लगाते हैं।
आओ हम सब मिल,
आध्यात्मिक चिंतन रमाते हैं,
साथ बैठ कर सब संग,
ध्यान का मौन सजाते हैं,
अंदर ही डुबकी लगाते है,
घर में कुम्भ मनाते है।
गंगा सा पवित्र जब मन होगा,
यमुना सा हृदय में प्रेम होगा,
सरस्वती सा जब ज्ञान होगा,
इसी त्रिवेणी संगम से,
स्वयं का कल्याण होगा।
इसी ध्यान की डुबकी में,
हम आनंद रचाते हैं,
घर में कुम्भ मनाते है।
घर में कुम्भ मनाते है।।

आज वास्तविक रूप से हम केवल केवल फल और फूल पर केंद्रित हो गए है, और दोखते ही उसको तुरंत तोड़ लेना चाहते है, वगैर यह सोचे कि वह कितने और किस किस के जतन से इस रूप तक आ पाया है, और कौन उसका सही हकदार है, जिसे वास्तव में वह फ़लीभूत होगा, इसे आपको एक घटना में रूप में बताते है।

एक दिन सुबह जब मैं ध्यान करने छत पर गई, तो ये पौधे को देखकर मन में ख्याल आया कि अगर हम बगीचा लगा रहे हैं, तो हम हमेशा फूल और फल पर ध्यान केंद्रित करने की कोशिश कर रहे हैं। जबकि मुझे ये लगा की फूल और फल पर ध्यान केंद्रित नहीं करना चाहिए; हमको जड़ पर ध्यान केंद्रित करने की ज़रूरत है। जड़ों को पोषित करने के बजाय, हम लगातार फूल और फल की तलाश में रहते हैं। हमको फूलों और फलों के लिए बैठकर ध्यान करने की ज़रूरत नहीं है, मगर जड़ को ध्यान की खाद से पोषित करने की जरूरत हैं, फिर फल फूल हमारे सिर चढ़कर आएगें, भले ही हम उन्हें न खोजें।

अगर हम जड़ों को पोषित नहीं करते हैं, तो फल और फूल नहीं आएंगे। हम इसके बारे में केवल सपने देख सकते हैं। लेकिन अगर हम जड़ को पोषित करते हैं, तो फूल और फल वैसे भी आएंगे। शायद हमारे जीवन के साथ भी ऐसा ही है। हमे अपने अंदर की जड़ को जो दिखाई नहीं देती यानी हमारी आत्मा को ध्यान के द्वारा पोषित करना है।तब खुशहाली हमारे चारों ओर रहकर ना केवल आनंद बरसाएगी बल्कि पहरेदारी में रहेगी, इससे हमारे बाहर भी वातावरण आनंद का ही होगा।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

इस आनंदित वातावरण से जिनके हृदय में ध्यान भक्ति और सतगुरु नाम बस गया, उनके लिए नित्य उत्सव है, नित्य मंगल है, नित्य रोशनी है, नित्य सौभाग्य है, नित्य कुंभ है और नित्य दीपावली है।इस आनंदित दिवाली में; जब हम ध्यान का दीये जलाएं, तो उनकी रोशनी से अपने भीतर मौजूद नकारात्मकता, निराशावाद, डर और हताशा का अंधेरा हमेशा के लिए दूर हो जाएगी। तब हम अंतरिक दीयों की रोशनी से खुद को पहचानें, और फिर अपने सद्गुरु से प्रार्थना करें आपकी हम पर यही कृपा हो, इस दिन गुरु पूजा करके खुद को पूरी तरह से विकल्पहीन बना लें।

हमारी यह गुरु पूजा; उनके समक्ष फल, फूल या नारियल चढ़ाने की नहीं, बल्कि दिव्यता को आमंत्रित करने की एक सूक्ष्म प्रक्रिया है। हमारा सम्पूर्ण अनुष्ठान बस यही रहना चाहिए कि, जब हम ऐसे हो जायें कि हमारे पास भी कोई विकल्प नहीं होगा, तब उस परम पिता व सद्गुरु को पूजा ग्रहण करने के लिए हमारे ह्रदय में आना ही होगा। और तब हमारे अंदर का दिया प्रकाशमान होकर अपनी चमक से सारे अंधेरे को दूर कर देगा और यह जीवन प्रकाशमय हो जाएगा, सम्पूर्ण जगत हमारे अंदर होगा और अंदर ही कुंभ घटित हो उठेगा।

||आत्मा मालिक||

- नरेश एवम नीता यादव,

आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

तक्ता-४

(नियम ८)

दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसानंतर प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकात प्रकाशित करावयाचे 'ॐ गुरुदेव' या मासिकाची मालकी व अन्य तपशिलाबाबतचे निवेदन.

१.	प्रकाशनाचे स्थळ	:	विश्वात्मक जंगली महाराज आश्रम, कोकमठाण, शिर्डी-कोपरगांव रोड, पो. कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१
२.	प्रकाशनाचे स्वरुप	:	मासिक
३.	मुद्रकाचे नाव	:	संतोष माळी
	भारताचे नागरिक आहेत काय?	:	होय
	पत्ता	:	श्री ग्राफिक्स, राजेंद्र कॉम्प्लेक्स, इनडोअर गेम हॉल शेजारी, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१
४.	प्रकाशकाचे नाव	:	संत परमानंद महाराज
	भारताचे नागरिक आहेत काय?	:	होय
	पत्ता	:	विश्वात्मक जंगली महाराज आश्रम, कोकमठाण, शिर्डी-कोपरगांव रोड, पो. कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१
५.	संपादकाचे नाव	:	संत परमानंद महाराज
	भारताचे नागरिक आहेत काय?	:	होय
	पत्ता	:	विश्वात्मक जंगली महाराज आश्रम, कोकमठाण, शिर्डी-कोपरगांव रोड, पो. कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१

मी संत परमानंद महाराज या द्वारे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे खरा आहे.

दिनांक : १ मार्च २०२५

sd

संत परमानंद महाराज

प्रकाशकाची स्वाक्षरी

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

आत्मा मालिक होळी चौदस पौर्णिमा



















सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

।। सबका मालिक आत्मा ।।



परमपूज्य सद्गुरु माऊलींच्या दिव्य सानिध्यात

आत्मा मालिक चैत्र महोत्सव

८ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५

दैनंदिन कार्यक्रम रुपरेषा

• पहाटे ४.०० ते ६.००	- श्रीपादुका अभिषेक , ध्यान व काकडआरती.
• सकाळी ६ :०० ते ७:००	- योग सत्र
• सकाळी ७.०० ते ८.००	- चहापान -नास्ता
• सकाळी ९.०० ते ११.३०	- मौन ध्यान, भजन, प्रवचन, व मध्यान्ह आरती.
• दुपारी १२.०० ते १.००	- महाप्रसाद
• दुपारी ४:०० ते ५:००	- हरीपाठ
• सायंकाळी ५:०० ते ६:००	- मौन ध्यान व आरती
• सांय. ७:०० ते ८.३०	- भजन, प्रवचन व संध्या आरती.
• रात्री ८.३० ते ९.३०	- महाप्रसाद
• रात्री ९.३०	- शेजारती



आयोजक

आत्मा मालिक ध्यान योग मिशन

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण,
शिर्डी-कोपरगांव रोड, ता. कोपरगांव, जि.अ.नगर

* प्रेषक *

संपादक, मासिक ॐ गुरुदेव

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१